# हेल्थ केअर विभाग

सदृष्ट शरीर व रोगापासून मुक्ती म्हणजेच आरोग्य असा पूर्वीचा समज होता. जागतिक आरोग्य संघटनेने आरोग्याची व्याख्या पुढील प्रमाणे केलेली आहे, "आरोग्य म्हणजे रोग किंवा अपंगत्वाचा निव्वळ अभाव नसून शारीरिक, मानसिक आणि सामाजिकदृष्ट्या संपूर्ण स्वस्थता असलेली स्थिती होय."

जागतिक आरोग्य संघटनेने 1977 मध्ये सार्वासाठी आरोग्य ही घोषणा केली. प्रत्येक व्यक्तीला सामाजिक व आर्थिकदृष्ट्या उपयुक्त असे आयुष्य जगण्यासाठी आवश्यक असलेल्या आरोग्याच्या पातळीवर आणणे म्हणजे सर्वासाठी आरोग्य होय"

प्रत्येक देशाने इ.स.2000 पर्यंत सर्वांसाठी आरोग्य या ध्येयासाठी आरोग्यसेवांचे नियोजन करावे असे ठरविण्यात आले.

1982 मध्ये भारत सरकारने राष्ट्रीय आरोग्य धोरण जाहिर केले.

**महाविद्यालयीन आरोग्य (College Health)** महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे वय हे शारीरिक मानसिक वाढीच्या दृष्टीने महत्वाचे असते. उत्साह, जोम, कल्पकता, नाविन्याची ओढ, धडाडी याच वयातील गुण वैशिष्ट्ये बदलती जीवनशैली, ताणतणाव, प्रसारमाध्यमे यांचा विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होताना दिसत आहे. या वयात शिक्षणाद्धारे केलेले संस्कार दूरगांमी परिणाम घडवू शकतात. म्हणून या वयात आरोग्य शिक्षण दिल्यास मुलांमध्ये आरोग्यदायी सवयीची जोपासना शक्य होते.

## महाविद्यालयीन आरोग्याची उद्दिष्ट्ये :-

1) आरोग्याची सर्वांगीण उन्नती
2) रोग प्रतिबंध
3) रोगाचे निदान व उपचार
4) आरोग्य शिक्षण

महाविद्यालयीन आरोग्य सेवा कार्यक्रमात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली जाते यामध्ये रक्तगट तपासणी, हिमोग्लोबील पातळी, प्रथमोपचार, इ. कार्यक्रम राबविले जातात. विविध तज्ज्ञ व्यक्तिींची व डॉक्टरांची व्याख्याने आयोजित केली जातात.तसेच मौखीक तपासणी, नेत्रतपासणी करण्यात येते विद्यार्थ्यांच्या शारीरिक तक्रारीचे निवारण केले जाते.

विविध भित्तीपत्रके तयार करण्यात येतात यात साथीचे आजार, लक्षणे, उपचार व आहारची माहिती दिली जाते.

बीड शहरातील इतर महाविद्यालयातील आरोग्य विषयक व्याख्यानांना विद्यार्थ्यांना घेऊन जाण्यात येते. 'सुरक्षित मातृत्व कार्यशाळा' तसेच 'किशोरी विकास कार्यशाळा' यात्त मुलीचा सहभाग असतो.